Record. - GR file -

आय. ए. कुंदन, भा.प्र.से.
प्रधान सचिव (कामगार)

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दूरध्वनी : ०२२-२२०२ ७४३३ / २२८२ २१०५
ई-मेल : sec.labour@maharashtra.gov.in

दिनांक : १० मार्च,२०२५

अ.शा. पत्र क्र. इबांका-०३२५/प्र.क्र.२८/कामगार-७

विषय:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची "कामगार उपकर संकलन प्रणाली (Labour Cess Collection Portal)" कार्यान्वित करणेबाबत.

श्री. अरिबम आर. शर्मा,

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ लागू केला आहे.बांधकाम कामगारांकरीता कल्याणकारी योजना राबविण्याकरीता मंडळास निधीची आवश्यकता लागेल ही बाब विचारात घेवून, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ लागू केला आहे.सदर अधिनियमातील कलम (३) (१) अन्वये दिनांक २६ सप्टेंबर, १९९६ रोजी अधिसूचना जारी केली असून, त्यानुसार इमारत व इतर बांधकाम क्षेत्रातील प्रत्येक बांधकाम मुल्याच्या (जमिन मूल्य वगळून) १% उपकर हा मंडळाकडे जमा करावयाचा आहे.

२. इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियम (रोजगार नियमन व सेवाशर्थी), १९९६ मधील कलम (१८) नुसार प्रत्येक राज्याने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ गठीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्थी) नियम, २००७ अस्तित्वात आले असून, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना दिनांक ०४ ऑगस्ट,२००७ रोजी करण्यात आलेली आहे.शासन निर्णय दिनांक २१ एप्रिल,२००८ अन्वये राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २००८ पासून उपकर वसूल करून मंडळाकडे जमा करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या आहेत.

३. इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम (८) अन्वये,मंडळाकडे उपकर जमा न केल्यास दरमहा २% व्याज जमा करावे लागते.तसेच चुकवलेल्या उपकराच्या मर्यादेमध्ये दंड भरण्याची तरतूद सदर कायद्याच्या कलम (९) मध्ये आहे.सदर चुकविलेला उपकर, व्याज व दंड हा जमिन

महसूल ग्रहीत धरून वसूल करण्याचीही तरतूद कायद्याच्या कलम (१०) मध्ये आहे.सदर कायद्याखाली उपकर जमा करणे तसेच, सदर वसूलीबाबत बांधिल असलेल्यांनी चुकीचा माहीती सादर केल्यास कायद्याच्या कलम (१२) अंतर्गत सहा महिन्यापर्यंत कारावास अथवा एक हजारापर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षेस पात्र राहील अशी तरतूद आहे.

४. सदरचा उपकर वसूल केल्यानंतर मंडळाच्या बँक खात्यावर भरण्याची कार्यवाही ही विविध यंत्रणांकडून सुरू आहे.त्याकरीता कामगार विभाग व मंडळामार्फत वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.सदरची प्रक्रिया ही पुर्णत: असंगणकीय स्वरूपाची (Manual Procedure) असल्याने,संकलित होणा-या उपकराचे प्रभावी संनियंत्रण व समायोजन होत नव्हते.

५. सदरची बाब विचाराच घेवून, मंडळामार्फत **"कामगार उपकर संकलन प्रणाली (Labour Cess Collection Portal)"** विकसित करण्यात आली आहे.सदर प्रणालीवर प्रत्येक यंत्रणेने नोंदणी करणे (On Board) आवश्यक आहे.याकरीता पुर्णवेळ स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात आला असून, संपर्काकरीता मो.क्र. (+९१) ९६५३१९८४६५ व ई-मेल cessbocw@gmail.com हा आहे. आपल्या नियंत्रणाखालील यंत्रणेस सदर प्रणालीवर नोंदणी होण्याच्या सूचना आपल्यास्तरावरून देणे आवश्यक आहे.सदरच्या प्रणाली हाताळण्याचे प्रशिक्षण व पुर्णवेळ सहकार्य कक्षामार्फत करण्यात येईल.

६. सदर प्रणालीचे अनावरण मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्याचे प्रस्तावित असल्याने,आपल्या अधिनस्त कामगार उपकर वसूल करीत असलेल्या यंत्रणेस सदरच्या प्रणालीवर तातडीने नोंदणीकृत होण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

आपली स्नेहांकीत,

(आय.ए.कुंदन)

प्रति,

श्री. अरिबम आर. शर्मा,भा.प्र.से.
आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.